**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**

नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ७२ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - २३१** **दिनांक - ०५/१२/२०२५**

**विभाग — बांधकाम विभाग**

---

**प्रस्तावाचा-** आपत्ती सौम्यीकण अंतर्गत ( पूर प्रतिबंधक कामे करणे ) या कामाची ई निविदा क्रमांक १२४८१९४-१ सन २०२५-२६ निविदा मंजूरी बाबत. - -

**--

**ठराव** — विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, आपत्ती सौम्यीकण अंतर्गत ( पूर प्रतिबंधक कामे करणे ) या कामाची ई निविदा मागविण्यात आली. उक्त विषयाबाबत खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

1) प्रशासकीय मान्यताः- मा. शासन निर्णय क्रमांक- आव्यप्र २२४/प्र.क्र.१३८/ आव्यप्र२ दि.३ ऑक्टोबर २०२४
2) ई निविदा क्रमांक १२४८७१९४-१ सन २०२५-२६ दि. १९/११/२०२५
3) निविदा विक्री कालावधी १९/११/२०२५ ते दि. २६/११/२०२५
4) निविदा स्विकारणेची दिनांक १९/११/२०२५ ते २६/११/२०२५
5) निविदा उघडेचा दिनांक २७११२०२५
6) कामाची मुदत १२ महिने
7) प्राप्त झालेल्या निविदेचा तपशील दिनांक ०२/१२/२०२५ रोजीच्या छाननी समितीचे शिफारशीनुसार

| ई निविदा क्रमांक | कमाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर ( निविदा दरापेक्षा ) | सर्वात कमी दराचे निविदा धारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १२४८१९४-१ | सीना नदी व भिंगार कॅनल खोलीकरण व रूंदीकरनण करणे | १६,६६,६७,३४१/- | आरडे डेइलेक्ट्रीकल्स , अहिल्यानगर<br>--------------------<br>साईरत्न कंस्ट्रक्शन्स प्रा.ली अहिलयानगर<br>--------------------<br>यशश्री सप्लायर ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर ,अहिल्यानगर | निविदा दराने<br>--------------------<br>निविदा दरापेक्षा ८.९२० % जादा दराने<br>--------------------<br>निविदा दरापेक्षा ७.०००% जादा दराने | आरडे इलेक्ट्रीकल्स अहिल्यानगर<br>--------------------<br>निविदा दराने |

वरील रकाना क्रमांक ६ मध्ये नमुद निविदाधारक आरडे इलेक्ट्रीकल्स, अहिल्यानगर यांची निविदा निविदा दराने आलेली असून सदर निविदा सर्वात कमी दराची आहे.

सदर कमी दराची निविदा मा. शासन निर्णय क्रमांक आव्यप्र २०२४/प्र.क्र.१ / आव्यप्र-२ दि.१० जानेवरी २०२४ मधील मुद्दा क्रमांक २.१२ नुसार आलेल्या दराची निश्चिती बाबतची शिफारस आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडेस मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे. असे आदेश आहेत.

आरडे इलेक्ट्रीकल्स, अहिल्यानगर यांची सदरची निविदा यांची सर्वात कमी दराची, "निविदा दराने " आलेली आहे. मा. स्थायी समितीच्या शिफारशी नुसार निविदा मंजूर करणे बाबतचा प्रस्ताव मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग , मंत्रालय, मुंबई, यांचे कडेस पाठविण्यास मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

( सही )
**( मेहेर लहारे )**
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

( सही )
( यशवंत डांगे )
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ७२ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - २३२** **दिनांक - ०५/१२/२०२५**
**विभाग – अर्थ विभाग**

---

**प्रस्तावाचा-** अतिरिक्त चटई निर्देशाक पोटी प्रमियम रकमेतुन कामे करणे या लेखाशिर्षात खर्चाच्या तरतुदीमध्ये रक्कम रू. ३००.०० लक्षाची वाढीव तरतूद करणेबाबत.

- -**--

**ठराव** – विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, सन २०२५-२०२६ या अर्थिक वर्षासाठी " अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशा कपोटी प्रिमियम रकमेतुन कामे करणे" या लेखाशिर्षात रक्कम रु.२३.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे, मात्र सदरची तरतूदीतून आजअखेर रक्कम रु.२२,८२,८३,५१८/- इतक्या रकमेचे प्रस्ताव खतविण्यात आलेले असून रक्कम रु.१७,१६,४८२/- इतकी शिल्लक आहे. तथापि मनपा फंडातून निधी अभावी कामे करता येत नसल्याने विकास कामे करण्यास अडचणी येत आहेत. त्यामुळे नागरीकांच्या रोषास मनपास सामोरे जावे लागत आहे, त्यामुळे या लेखाशिर्षातून रक्कम रु.३००.०० लक्ष कमी करुन "अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमियम रकमेतुन कामे करणे या लेखाशिर्षात रक्कम रु.३००.०० लक्षची तरतूद वाढविणे व याबाबत नगररचना विभागाचा अभिप्राय घेवून.
अर्थसंकल्पाचे पुर्नविलोकन करणे योग्य आहे.

**लेखाशिर्षातील कमी अधिक रकमेचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे**

| अ.क्र | लेखा शिर्ष | २०२५-२६ | या पूर्वीचा खर्च ( लाखत ) | शिल्लक ( लखात ) ३-४ | प्रस्तावित केलेली वाढीव रक्कम ( लाखात ) | एकुण तरतूद ( लाखतात ) (३+६) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमियम रकमेतुन कामे करणे | २३००.०० | २२८२.८४ | १७.१६ | ३००.०० | २६००.०० |

सदर तरतूदीमध्ये वाढ करणे साठी खाली नमूद लेखाशिर्षातून चालू अर्थिक वर्षासाठी करण्यात आलेली कमी करणेस हरकत नाही.

| अ.क्र | लेखाशिर्ष | २०२५-२६ | या पूर्वीचा खर्च ( लाखत ) | शिल्लक ( लखात ) ३-४ | कमी करावयाची तरतूद रक्कम ( लाखात ) | सुधारीत तरतूद ( लाखतात ) (३+६) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | रस्ते खोदाई फि मधुन रस्ते करणे/दुरूस्ती | ६००.०० | ०० | ६००.०० | ३००.०० | ३००.०० |

उक्तप्रमाणे "अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमियम रकमेतुन कामे करणे " या लेखाशिर्षात रक्कम रु.३००.०० लक्षची वाढीव तरतूद करणेकामी नगररचना विभागाचा अभिप्राय घेवून सदरचा पस्ताव सादर करण्यात आला असता, प्रस्तावातील शेरांकना नुसार मा.आयुक्त, यांचेशी झालेल्या चर्चेत अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक प्रिमियमपोटी रकमेतून कामे करणे या लेखाशिर्षात एकुण रक्कम रू.११.०० कोटी रकमेची वाढ करणे बाबत सुचित केले आहे. त्यानुसार खाली नमुदप्रमाणे इतर मनपा फंडातून रकमा कमी करून कार्यवाही करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | २०२५-२६ ची मुळ तरतुद ( लाखात ) | कमी करावयाची रक्कम ( लाखात ) | एकुण सुधारीत तरतुद ( लखात ) (३-४) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | रस्ते खादाई फि मधुन रस्ते करणे / दुरूस्ती | ४७५.०० | ३००.०० | १७५.०० |
| २ | नवीन रस्ते | ३००.०० | १५०.०० | १५०.०० |
| ३ | नवीन प्रशासकीय इमारत | १२५.०० | १००.०० | २५.०० |
| ४ | रस्ते दुरूस्ती | ३००.०० | २००.०० | १००.०० |
| ५ | प्रकल्प अहवाल तयार करणे | ५००.०० | ३००.०० | २००.०० |
| ६ | थकित देयके अदा करणे | १०९६.४९ | ५०.०० | १०४६४९ |
| | | २७९६.४९ | ११००.०० | १६९६.४९ |

उपरोक्त प्रमाणे "अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमियम रकमेतुन कामे करणे" या लेखाशिर्षात मुळ तरतूदीसह (मुळ तरतुद रू. २३००.०० लक्ष) रक्कम रू.३४००.०० लक्षची वाढीव तरतूद करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १०३ नुसार सन २०२५-२६ चे पुर्नविनियोजन अंदाजपत्रक तयार करणेस मा. स्थायी समिती च्या शिफारशी नुसार मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

( सही )
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

( सही )
( यशवंत डांगे )
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका